सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता राष्ट्रीय छात्रसेना कार्यालयाच्या विविध प्रशिक्षण व शिबीरे आयोजनाकरीता आवश्यक असणाऱ्या निधी वितरणास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांक :- राछासे-२०१९/प्र.क्र.१८८/क्रीयुसे-३

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- १२ जुलै, २०१९.

<u>वाचा</u> :- १) वित्त विभागाचे शासन क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३,दि.३० जून, २०१७.
२) क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र. राछासे/अर्थ.प्रशिबीरे / २०१९-२०/(५)/का-५/५२४ दि. १४ मे, २०१९

प्रस्तावना :-

महाराष्ट्रातील राष्ट्रीय छात्रसेना कार्यालयांना सन २०१९-२० या आर्थिक वर्षात राष्ट्रीय छात्रसेनेंतर्गत विमानाचे नमुने बनविणे, मायक्रोलाईट फ्लाईंग, ग्लायडींग प्रशिक्षण, जहाजाची प्रतिमा बनविणे, प्रजासत्ताक दिन शिबीर-२०,व्हीएससी-वायु सैनिक शिबीर-१९, एनसीसी-नौ सैनिक शिबीर-१९, टीएससी (मुले) शिबीर-१९, टीएससी (मुली) शिबीर-१९, मेनू-२१ शिबीर व एनसीसी दिवस साजरा करणे-२० इत्याती प्रशिक्षण व शिबीरे आयोजित करण्यासाठी मंजूर रक्कम रू. २,४३,८६,१८८/-(अक्षरी रू. दोन कोटी त्रेचाळीस लक्ष शह्यांऐशी हजार एकशे अठ्ठयाऐंशी फक्त) निधी वितरीत करण्याची बाब या नस्तीवर विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महाराष्ट्रातील राष्ट्रीय छात्रसेना कार्यालयांना सन २०१९-२० या आर्थिक वर्षात राष्ट्रीय छात्रसेनेंतर्गत विमानाचे नमुने बनविणे, मायक्रोलाईट फ्लाईंग, ग्लायडींग प्रशिक्षण, जहाजाची प्रतिमा बनविणे, प्रजासत्ताक दिन शिबीर-२०, व्हीएससी-वायु सैनिक शिबीर-१९, एनसीसी- नौ सैनिक शिबीर-१९, टीएससी (मुले) शिबीर-१९, टीएससी (मुली) शिबीर-१९, मेनू-२१ शिबीर व एनसीसी दिवस साजरा करणे-२० इत्याती प्रशिक्षण व शिबीरे आयोजित करण्यासाठी मंजूर रक्कम रू. २,४३,८६,१८८/-(अक्षरी रू. दोन कोटी त्रेचाळीस लक्ष शह्यांऐशी हजार एकशे अठ्ठयाऐंशी फक्त) निधी संदर्भ १ च्या शासननिर्णयान्वये वितरीत करण्यास व सदर रक्कम आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्या अधिनस्त ठेवण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

परिशिष्ट :- अ

अ. क्र.	कार्यालयाचे नांव	विमानाचे नमुने बनविणे	मायक्रोलाईट फ्लाईंग	ग्लायडींग प्रशिक्षण	जहाजाची प्रतिमा बनविणे	एकूण
१.	१ महा. हवाई पथक, मुंबई	रू.२,४७,७४८/-	रू.४,९९,००४/-	रू.४,२७,३२४/-	००	रू.११,७४,०७६/-
२.	२ महा. हवाई पथक, नागपूर	रू.३,९३,२५०/-	रू.७,२३,७८६/-	००	००	रू.११,१७,०३६/-
३.	३ महा. हवाई पथक, पुणे	रू.४,८४,०००/-	रू.५,९७,७४०/-	००	००	रू.१०,८१,७४०/-
४.	१ महा. नाविक दल, मुंबई	००	००	००	रू.२,५८,४७३/-	रू.२,५८,४७३/-
५.	२ महा, नाविक दल, रत्नागिरी	००	००	००	रू.५,८५,१०४/-	रू.५,८५,१०४/-
६.	३ महा. नाविक दल, पुणे	००	००	००	रू.१,५२,०३३/-	रू.१,५२,०३३/-
७.	४ महा. नाविक दल, नागपूर	००	००	००	रू.१,५९,७२०/-	रू.१,५९,७२०/-
	एकूण	रू.११,२४,९९८/-	रू.१८,२०,५३०/-	रू.४,२७,३२४/-	रू.११,५५,३३०/-	रू.४५,२८,१८२/-

परिशिष्ट :- ब

अ. क्र.	शिबीराचे नांव	आहरण व संवितरण अधिकारी	सहभागी छात्र व अंशकालीन अधिकारी संख्या	शिबीर आयोजन कालावधी	मंजूर करावयाची प्रस्तावित रक्कम (रूपये)
१.	प्रजासत्ताक दिन शिबीर-२०	३८ महा. बटा. राछासे. सोलापूर	०२+१११=११३	दि.१.१.२०२० ते दि. २८.१.२०२०	रू.१,१२,००,०००/-
२.	व्हीएससी-वायु सैनिक शिबीर-१९	३ महा. हवाई पथक, पुणे	०१+३६=३७	ऑक्टो-२०१९	रू.१९,०१,०२०/-
३.	एनएससी- नौ सैनिक शिबीर -१९	३ महा. नाविक दल, पुणे	०१+४०=४१	ऑक्टो-२०१९	रू.१४,८१,६२१/-
४.	टीएससी (मुले) शिबीर-१९	४ महा. मुलींचे पथक , राछासे. अमरावती	०१+४०=४१	सप्टें-२०१९	रू.११,१०,०००/-
५.	टीएससी (मुली) शिबीर-१९	७ महा. मुलींचे पथक, राछासे, औरंगाबाद	०१+४०=४१	सप्टें.-२०१९	रू.११,८०,१४१/-
६.	मेनू-२१ शिबीर	२ महा. नाविक दल, रत्नागिरी	०२+४०=४२	जाने-२०२०	रू.१०,७३,२२४/-
७.	एनसीसी दिवस साजरा करणे-२०	५ महा. मुलींचे पथक, राछासे, मुंबई		फेब्रु-२०२०	रू.१९,१२,०००/-
	एकूण				रू. १,९८,५८,००६/-

२. उपरोक्त संदर्भात होणारा खर्च "मागणी क्रमांक ई-३, २२२४-क्रीडा व युवक सेवा-१०२, विद्यार्थ्यांसाठी युवक कल्याण कार्यक्रम (०१)(०१) राष्ट्रीय छात्रसेना योजनेतर (२२०४-००१६)-२१ पुरवठा व सामुग्री या लेखाशिर्षाखालील मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा. सदरचे अनुदान ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आले आहे त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्यात यावे.

वित्त विभागाच्या दि. २४.०७.२०१५ च्या शासन परिपत्रकानुसार खालील बाबी नमुद करण्यात येत आहेत.

१) वित्त विभागाच्या दि. ३०.६.२०१७ च्या शासन परिपत्रकान्वये निधी वितरणाचे अधिकार विभागास आहेत.

२) ज्या लेखाशीर्षाखाली अनुदान वितरीत करण्यात येत आहे त्या लेखाशीर्षांतर्गत गतवर्षापूर्वीचे संक्षिप्त देयक प्रलंबित नाही.

३) दि. २४.०७.२०१५ च्या आदेशातील इतर मुद्दे या आदेशास लागू नाहीत.

४) परिपत्रकातील "अ" व "ब" ची पूर्तता होत आहे.

३. वित्त विभागाच्या दि. २४.७.२०१५ व दि. ३०.०६.२०१७ च्या परिपत्रकातील सूचनांनुसार उपरोक्त तरतूद खर्च करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. यासाठी संबंधित समादेशक अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी तर विभागीय उपसंचालक (क्रीडा) यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने अनौ.संदर्भ क्र. ४२८/२०१९/व्यय-५, दि. २९.०६.२०१९ व संदर्भाधीन दि. ३०.०६.२०१७ च्या परिपत्रकातील सूचनांना अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०७१२१५३८३७५८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2019.07.12 16:01:50 +05'30'

(राजेंद्र पवार)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक

२. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई

३. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर

५. महालेखापाल (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर

६. वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई

७. अतिरिक्त महासंचालक, राष्ट्रीय छात्रसेना संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

८. सर्व उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा (संचालनालयामार्फत)

९. निवड नस्ती, (क्रीयुसे-३)